# <u>नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर</u>

## <u>पोलीस स्टेशन कोंढाळी येथील कलम ३९२, ३४ भादवि. चे गुन्हयातील आरोपीतांचा ६ तासामध्ये शोध लावून गुन्हयातील मुद्देमाल आरोपीतांकडून हस्तगत केल्याबाबत.</u>

दि. २२/०४/१६ रोजी फिर्यादी नामे - रमेश रामराव भोंगे, वय ५० वर्ष, रा. दुधाळा ता. काटोल यांनी पो.स्टे. ला येवून रिपोर्ट दिली कि, दि. २२/०४/१६ रोजी पत्नी सौ. शांताबाई रमेश भोंगे, वय ४५ वर्ष, सोबत बाजार चौक कोंढाळी येथून लग्नाचे आंदन घेवून पायी लग्न कार्यक्रमात जात असता, समोरून काळया रंगाच्या मोटार सायकलवर बसून आलेल्या दोन अनोळखी इसम २५ ते ३० वर्ष यांनी त्यांचे पत्नीचे गळयातील सोन्याची १५ ग्रॅमची पोत किंमती ३५,०००/- रू. ची जबरीने हिसकावून चारून नेली. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे.ला अप क्र. ८१/१६ कलम ३९२, ३४ भादंवि. चा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर गुन्हयाचा तपास सपोनि. श्री. पितांबर जाधव, ठाणेदार पो.स्टे. कोंढाळी यांचे मार्गदर्शनामध्ये तपासी अधिकारी मपोउपनि. श्रीमती सोनाली गोरे, सोबत सहा.फौ. सुरेश मुडे, ब. नं. १२५८, पोहवा. जयसिंग पवार, ब. नं. ६१२, संजय मांडवगडे, ब. नं. ४३५, चालक नापोशी. सुधाकर उईके, ब. नं. ६०१, हयांनी केला आहे. नमुद गुन्हयाचा तपासामध्ये घटनास्थळ पंचनामा कार्यवाही करून गुन्हयातील आरोपीतांचा नाकाबंदी करून संशयीत ठिकाणी पोलीस मित्र नामे - भदुसिंग पनुसिंग चव्हाण, वय ४९ वर्ष, रा. पुसागोंदी यांचे मदतीने मौजा पुसागोंदी येथे जावून फिर्यादीने वर्णन केलेल्या वर्णनाचे ईसमांबाबत माहीती घेवून संशयीत ईसम नामे - क्र. १) रोहीदास ममराज राठोड, वय ३० वर्ष, २) किशोर हंसराज राठोड, वय २४ वर्ष, दोन्ही रा. पुसागोंदी यांना गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता त्यांनी सुरूवातीला उडवाउडवीचे उत्तरे दिली. परंतु सखोल विचारपुस चौकशी दरम्यान आरोपीतांनी ‘‘ दि. २२/०४/१६ रोजी दुपारी ०३/३० वा. दर. कोंढाळी येथे मोटार सायकलने गेलो. व तेथे जावून समोरून येणा-या फिर्यादी व त्याचे पत्नीला बघून मोटार सायकल वरील आरोपीतांपैकी मागे बसलेला आरोपी क्र. २ यांने फिर्यादीच्या पत्नीच्या गळयातील वरील नमुद वर्णनाची सोन्याची पोत हीसकावली व घटनास्थळावरून मोटार सायकलने पळ काढला ‘‘ असे सांगितले. आरोपीतांचे गुन्हयातील कबुलीमुळे आरोपीतांना गुन्हयात दि. २२/०४/१६ रोजी अटक करण्यात आली. दि. २३/०४/१६ रोजी आरोपी क्र. २ याचा कलम २७ भापुका अन्वये मेमोरंडम नोंदवून गुन्हयातील मुद्देमाल आरोपी क्र. २ यांचे घरातून पंचांचे समक्ष जप्त करून हस्तगत करण्यात आला.

## पोलीस स्टेशन कुही येथील कलम ३०२, २०१ भादंवी. मधील कथानक अहवाल

पोलीस स्टेशन कुही येथे फिर्यादी नामे - सोमेश्वर केशवराव राऊत, वय ४८ वर्ष, रा. चिमणाझरी (पोलीस पाटील) यांनी दिनांक १०/०३/२०१६ चे १४.४७ वा. लेखी रिपोर्ट दिली की, मौजा चिमणाझरी शिवारातील प्रविण कोकाटे यांचे शेताजवळील नाल्यात एक अनोळखी इसम, वय अंदाजे २५ ते ३० वर्ष, वयोगटातील इसमाचे प्रेत पडलेले आहे. त्यास अज्ञात आरोपींतानी अज्ञात कारणावरुन त्याचे डोक्यावर दगडाने ठेचून गंभीर जखमी करुन त्याचा खुन केला आहे. अश्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे अप. क्र. ४८/१६ कलम ३०२, २०१ भादंवी. अन्वये गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचा तपास खालील प्रमाणे करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयातील फिर्यादी यांनी लेखी फिर्याद देण्यापुर्वी आम्हाला (तपासी अधिकारी) सदर घटनेची माहिती होताच आम्ही घटनास्थळावर रवाना झालो. व घटनास्थळाची बारकाईने पाहणी करुन नापोशि. ब. न. ६२६ यांचे हस्ते व्हिडीओ चित्रीकरण करणारे फोटोग्राफर श्री. दुधराम रामचंद्र वाढई, रा. उंद्री यास सोबत घटनास्थळावर आणण्याचे आदेश दिले. व्हिडीओग्राफर हे घटनास्थळावर हजर असून सदर घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली असता सदरचे प्रेत हे मौजा चिमनाझरी शिवारातील प्रविण कोकाटे यांचे शेताशेजारील नाल्यात असून सदरचे प्रेतापासुन उत्तरेकडे २०० मिटर अंतरावर एक पोपटी रंगाचा शर्ट रक्ताने भरलेला रस्त्याचे बाजुला पडलेला मिळुन आला. सदर ठिकाणापासुन १२०० मिटर अंतरावर उत्तरेकडे वडद फाटयाजवळ ऐ.जे. लॅन्ड डेव्हलपरचे खाली जागेत रक्ताने भरलेले दगड सरकारी पंच न मिळाल्याने खाजगी पंचासमक्ष कार्यवाही करुन मोक्यावर जप्त करुन सिल करण्यात आले आहे. तसेच सदर प्रेताचा इंक्वेस्ट पंचनामा तयार करुन संबधीत कागदपत्रासह प्रेत पि.एम. करणेकामी व ओळख पटविणेसाठी प्रेत शितगृहात ठेवणेबाबत पत्र देण्यात आले.

सदर गुन्हयाचे घटनास्थळावर नागपूर (ग्रामीण) पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग तसेच स्थागुशा. पोलीस निरीक्षक, डॉग स्कॉड यांनी घटनास्थळावर भेट दिली असून मा. वरिष्ठांनी सदर गुन्हयात मार्गदर्शन केले आहे.

सदर गुन्हयातील अनोळखी मृतदेह याची ओळख पटविणेकामी शोधपत्रीका तयार करण्यात आली. तसेच ई-मेल, व्हॉटस्ॲपवर, नागपूर शहर व ग्रामीण गृपवर माहिती देण्यात आली तसेच वायरलेस मॅसेज करण्यात आला. मृतकाची ओळख पटविणेकामी घटनेशेजारील लोकांना विचारपूस करण्यात आली असून येणारे जाणारे लोकांना प्रेत दाखवून ओळख पटविण्याचा प्रयत्न केला. तसेच डमडाटा काढणेबाबत सायबरला पत्र पाठविण्यात आले असून पोलीस कर्मचाऱ्यांच्या वेगवेगळया पथके तयार करुन परिसरात शोधपत्रिकासह पटविण्याचे आदेश दिले. तसेच वर्तमानपत्रात जाहिरात दिली. व केबल चॅनेलवर बातमी प्रसारीत करण्याबाबत पत्र व्यवहार करण्यात आला आहे. घटनास्थळाचे शेजारी राहणारे शेतवाले, हुडकेश्वर ते चिमणाझरी रोडवरील काम करणारे, हॉटेल, धाबे, टपरी,

दुकानवाल्यांना विचारपूस करुन बयाण नोंदविले. नागपूर शहरातील झोपडपट्टी, मुस्लीम एरिया, बसस्टॉप, रेल्वेस्टेशन, सार्वजनिक ठिकाणे, मजुरठिया येथे कर्मचारी पाठवून शोधपत्रिका वाटुन व लावून मृतकाची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला. व त्यांना विचारपूस करुन यादीसह बयाण नांदविले.

सदर गुन्हयातील अज्ञात मृतक इसमाची ओळख पटवित असतांना दिनांक १७/०३/२०१६ ला नापोशि. मिलींद मेंढे, पो.स्टे. कुही यांनी मृतकाची शोधपत्रीका सौ. रेखा अंकुश घोडाम व वडील श्री. अंकुश घोडाम, दोन्ही रा. उदयनगर, नागपूर यांनी मृतक मोनेश अंकुश घोडाम, वय २५ वर्ष, रा. उदयनगर, नागपूर याचे असल्याचे सांगीतल्याने सदर कर्मचारी यांनी आम्हास फोनद्वारे माहिती दिली. माहिती प्राप्त होतास मृतकचे आई-वडीलास मृतकचे कपडे पंचासमक्ष दाखविले असता सदर कपडे मृतक नामे - मोनेश घोडाम याचे असल्याचे मृतकचे आई वडीलांनी सांगीतले. तसेच दिनांक ०९/०३/२०१६ ला मृतक हा रात्री ०९.०० वा. सुमारास जेवण करुन बाहेर गेला असता दिनांक ०९/०३/२०१६ रोजी रात्रीला मृतक मोनेश याचेसोबती त्यास वस्तीत राहणारे आरोपी क्र. १) आकाश हरीदास दामणकर, वय २२ वर्ष, रा. न्यु सुभेदार ले आऊट, नागपूर २) नानेश्वर उर्फ नाना रायसिंग नेताम, वय ४० वर्ष, रा. जम्बुदीप आदीवासी नगर, नागपूर यांचे सोबत झगडा भांडण झाले व या झगडा भांडणामध्ये या दांघानीही मृतक यास पाहुण घेण्याच्या व जिवाने मारण्याच्या धमक्या दिलेल्या होत्या. तसेच आरोपी नाना नेताम याचे एका दुसऱ्या मुलीसोबत संबध असल्याचे मृतकास माहित होते. त्याने नाना याचे पत्नीला सांगीतले होते. त्यामुळे नाना व त्याचे पत्नीमध्ये भांडण होत होते. तसेच मृतक हा नानाचा हुडकेश्वर येथील अवैधदारुचा धंदा बंद कर, असे म्हणत होता. यावरुन दिनांक ०९/०३/२०१६ रोजी त्यांच्यात भांडण झाले. तेव्हापासुन मृतक हा गायब असून त्याचा या दोघांनीच खुन केलेला आहे. असा दाट संशय घेतल्याने यातील आरोपी १) आकाश हरीदास दामणकर, वय २२ वर्ष, रा. न्यु सुभेदार ले आऊट, नागपूर यास सदर गुन्हयामध्ये दिनांक १८/०३/२०१६ चे ०५.४१ वा. अटक करण्यात आलेली असून त्याचा दुसरा साथीदार हा पो.स्टे. हुडकेश्वर अप.क्र. ३१६७/१६ कलम ४, २५ आर्म ॲक्ट, सहकलम १३५ मु.पो.का. गुन्हयात अटक असून त्यास दिनांक १९/०३/२०१६ चे २३.०१ वा. सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. आरोपी क्र. १ याचा दिनांक २१/०३/२०१६ पंर्यत पि.सी.आर.घेण्यात आला असून आरोपी क्र. २ याचा दिनांक २४/०३/२०१६ पावेतो पि.सी.आर. घेण्यात आलेला आहे. आरोपी क्र. १ याचे सि.ए. परिक्षणाकरीता रक्त सॅम्पल घेण्यात आले असून आरोपी क्र. २ याचेकडुन गुन्हा करतेवेळी घातलेले कपडे मेमोरेंडम पंचनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आलेले असून पंचासमक्ष सिल करुन ताब्यात घेण्यात आलेले आहे.

सदर गुन्हयामचे पुरावेकामी आरोपीकडुन गुन्हा करतेवेळी वापरलेले कपडे जप्त करण्यात आले असून आरोपी सध्या एमसिआर वर असून आरोपीतांनी गुन्हा करतेवळी मृतक यास दगडानी तोंडावर व डोक्यावर मारुन खुन केला असल्याने जप्त दगडाची क्युरी करण्यात आली असून गुन्हयातील सर्व मुद्येमाल सि.ए. परिक्षणाकरीता पाठविण्यात आले. तसेच साक्षदार लोकांचे बयाण नोंदविण्यात आले असून मृतक यास दिनांक ०९/०३/२०१६ ला ०९.३० वा. सुमारास आरोपीची पल्सर मोटार सायकल क्र. एमएच - २९/वाय - ७३६५ वर बसवून नेतांना पाहणारा अक्षय उर्फ भुऱ्या

आणि दिललीप बहाडे, वय २० वर्ष, रा. नागपूर याचे कलम १६४ जा.फौ. प्रमाणे बयाण नोंदविण्यात आले असून इतर साक्षदार लोकांचे सविस्तर बयाण नोंदविण्यात आलेले आहे.

सदर गुन्हयात आरोपींतानी यापुर्वी केलेल्या गुन्हयाचे अहवालाबाबत पोलीस अधीक्षक साहेब गुन्हे शाखा, नागपूर शहर यांना पत्रव्यवहार करण्यात आला असून गुन्हयात कलम ३४ ची वाढ केल्याबाबत मा. जे.एम.एफ.सी. साहेब, कुही यांना माहिती देण्यात आली. तसेच मा. तालुका दंडाधिकारी साहेब, तहसिलदार उमरेड, यांना घटनास्थळ नकाशा काढुन देण्याबाबतचे पत्र पाठविण्यात आले. तसेच आरोपी यांनी गुन्हा करणपुर्वी ज्या शॉपीमधुन दारु विकत घेतली त्यांना सि.सि.टी.व्ही. फुटेज मिळणुबाबत पत्र पाठविण्यात आले आहे.

सदर गुन्हयातील मृतक हा अनोळखी असल्याने दिनांक १०/०३/२०१६ ते दिनांक १७/०३/२०१६ पावेतो अथक परिश्रम करुन नागपूर परिसरात वेगवेगळया पथकांच्या मार्फत प्रयत्न करुन त्याची ओळख पटवून आम्ही आरोपीला तात्काळ अटक करुन त्याचेकडुन गुन्हयात वारलेले कपडे, वाहन जप्त केले. महत्वाचे साक्षपुरावे नोंदवून त्यातील काही कलम १६४ जा.फौ. प्रमाणे बयाण नोंदवून घेतले. यामध्ये पोलीस स्टेशन अधिकारी, कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून वरिष्ठ अधिकारी यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. सर्वाच्या सहकार्याने व मेहनतीने मृतकाची ओळख पटवून आरोपीला अटक करण्यात यश आहे. व आरोपी विरुध्द सबळ पुरावा प्राप्त केला.

**पोलीस स्टेशन जलालखेडा येथील अप क्र. ४१/१६ कलम ३६३ भादंवि मधील कथानक अहवाल दक्षता मासीक मध्ये प्रकाशित होणेबाबत.**

हकिकत अशाप्रकारे आहे कि, फीर्यादी नामे - श्रीमती प्रतिभा सतिष मेश्राम, वय २९ वर्ष, रा. रोहणा हि आपल्या दोन मुली क्र.१) कु. खुशी वय ९ वर्ष व क्र.२. कु कशिश वय ७ वर्ष यांचे सह रोहणा येथे राहते .व मोल मजुरीचे काम करते. प्रतिभा हिचे पति काही वर्षाआधी मरण पावल्याने दोन्ही मुलींचे पालनपोषन करण्याची जबाबदारी प्रतिभावर येउन पडलेली आहे. मोल मजूरी करुन ती आपल्या दोन चिमुकल्या मुलींचे पालन-पोषण व शिक्षण करीत होती.खूशी ही वर्ग ३ री मध्ये तर कशिश ही वर्ग १ ली मध्ये असून गावामधिलच जि.प. प्राथमिक शाळेत शिकत आहे. प्रतिभा ही दैनंदिन कामावर जातांना तिच्या दोन्ही मुली शेजारी राहणा-या नातलगांच्या आश्रयाने राहतात. गावातील वातावरण विश्वासाचे असल्याने या मुलींना सुध्दा काधिही कुठल्याही प्रकारची समस्या निर्माण झाली नाही.

दि. १२/०४/१६ रोजी प्रतिभा ही सकाळी १०/०० वा.दरम्यान जवळच असलेल्या भारसिंगी गावात बॅंकेच्या कामानिमीत्त गेली होती. व दोन्ही मुली ह्या घरी हजर होत्या. बॅंकेचे कामकाज आटपून प्रतिभा ही दु. ०३.०० वा दरम्यान घरी परत आली असता तिला कु खुशी घरी दिसली नाही. यावरुन मुलगी आजूबाजूला कुठेतरी खेळत असावी या विचाराने तिने शेजारी विचारपूस केली परंतू खूशी कुणाकडेही मिळून आली नाही. आपल्या मुलीची चिंता वाटल्यामुळे प्रतिभाने पुन्हा घरी जाउन कु. कशिश हिला खुशीबाबत विचारले असता तिने आपल्या आईला माहिती दिली की '' शेजारी राहणारा व पाहूणा म्हणून आलेला सिद्धार्थ दादा आपले घरी आला होता, आमच्या सोबत तो खेळला, नंतर खुशिला चॉकलेट व आंबे देतो असे म्हणून खुशिला घेउन शेताकडे पळाला.'' हि माहिती समजताच प्रतिभा शेजारी राहणा-या रामू ढोणे यांचे घरी गेली, सिद्धार्थ हा रामु ढोणे यांचा दुरचा नातलग असून तो मधेमधे रामु ढोणे यांचे घरी येतो व दोन तीन दिवसांनी निघून जातो, मागिल २ /३ दिवसांपासुन तो पाहुणा म्हणून पुन्हा आलेला होता त्याबाबत रामु ढोणे कडे प्रतिभाने विचारपुस केली असता, सिद्धार्थ हा घरी नाही व कुठेतरी बाहेर गेला असावा असे उत्तर रामुने दिल्यामुळे प्रतिभाने शेजारील महिलांना पुन्हा विचारपुस केली असता खुशि ही शेताकडे सिद्धार्थ सोबत जातांना दिसल्याचे काही लोकांनी सांगितले.

यावरुन गावक-यांना सोबत घेउन आजूबाजूचे सर्व शेत, आमराइ, दुकाने पिंजून काढले परंतू खुशिचा व सिद्धार्थ चा कुठेही ठिकाना लागला नाही. दुपारी १२.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यत गावक-यांनी चोहीकडे शोध घेतला परंतू दोघेही मिळून न आल्याने व बराच वेळ झाल्याने शेवटी त्यांनी पोलिस स्टेशन जलालखेडा येथे तक्रार नोंदवली. घटनेचे गांभिर्य लक्षात घेता ठाणेदार सपोनि दिनेश लबडे यांनी घटनेची माहिती वरीष्ठांना दिली व तात्काळ दोन तपास पथक क्र. १. सपोनि दिनेश लबडे,

एएसआय गणपत जाधव ,पो.हवा संजय इंगोले, मंगेश नासरे तसेच तपास पथक क्र. २. पोउप नि विजय कोरडे, पो.हवा दिलीप इंगळे ,कृणाल अरगुडे, श्रीनिवास वाघ व पोलिस मित्र रुपेश चौधरी तपासात रवाना झाले.

दोन्ही पथकांनी पारडसिंगा , काटोल,भारसिंगी, इ.परीसरात संपूर्ण शेत ,जंगल,नदी नाले पिंजून काढले. परंतू काहीही माहीती मिळाली नाही. त्याचबरोबर परिसरातील बाजारपेठ, बसस्टॅण्ड, रेल्वेस्टेशन वरसुद्धा लोकांना व खब-यांना माहिती देण्यात आली व त्याच बरोबर आजूबाजूच्या परिसरातील खब-यांचे जाळे सुद्धा सक्रिय करण्यात आले.

घटनेला सहा तासांचा विलंब झाल्याने कोणत्याही प्रकारचा निर्णय घेण्यास तपास पथकांना अडचण होत होती. आरोपी सिद्धार्थ ढोणे वय २२ वर्ष याच्याबाबज माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला असता त्याचा कांणताही स्थावर ठिकाणा नसल्याची माहिती मिळाली, त्याला जवळचा कोणिही मित्र व नातलग नाही हा असाच लावारीस विवीध गावांमध्ये फिरत राहतो, याचेकडे मोबाइल फोन नाही, त्याचा फोटो सुद्धा कुणाकडेही मिळून आला नाही. त्यामुळे त्याला शोधने कठिण झाले होते. घटनेपासून सहा तास झाल्याने एवढ्यावेळात आरोपी कुठेही निघून जावू शकतो त्यामुळे संपूर्ण तपास पथक अधिक जोमाने कामास लागले. दरम्यान तपास पथकातील पो.हवा. दिलीप इंगळे यांना खबरीकडून माहिती मिळाली की काटोल नागपूर बस क्र.९५९२ ही बस नागपूरकडे जात असून यामध्ये एक संशयीत युवक दारु पिलेला असून त्याचे सोबत एक छोटी मुलगी सुद्धा आहे. यावरुन संशय वाढल्याने पथक १ सदर बसबाबत तपास करिता बस डेपो येथे जावून चौकशी केली असता, सदर बस ही सायंकाळी ७ वाजता काटोल येथून नागपूरकरिता रवाना झाल्याची व सध्या ती कळमेश्वर तालुक्यापर्यत पोहचत असल्याची माहिती मिळाली. परंतू तपास पथकाला काटोल ते कळमेश्वर अंतर कापणे तात्काळ शक्य नसल्याने सपोनि दिनेश लबडे योनी सदर माहिती कळमेश्वर पोलिसांना दिली व त्यानुसार तात्काळ कळमेश्वर परिसरात नाकाबंदी लावण्यात आली परंतू यावेळी दुर्भाग्य आड आले व नाकाबंदी लागण्याच्या काही वेळ आधिच सदर बस ही कळमेश्वर वरुन नागपूरकडे रवाना झाली होती. त्यामुळे सदर बसला नागपूर शहरात पोहोचण्याच्या आधी थांबविणे आवश्यक होते कारण नागपूर शहरामध्यक प्रवेश केल्यावर बस ला १० ते १२ थांबे लागतात त्यामुळे आरोपी हा मुलीला घेउन कोणत्याही थांब्यावर उतरण्याची शक्यता होती.

पो.स्टे गिट्टी खदान हे ग्रामिण व शहर यांचे सिमेवरील ठाणे असल्याने सदर बसला ही हद्द पार पाडावी लागणार होती यावरुन पो.स्टे गिट्टी खदान यांना माहिती देउन जुना काटोल नाका येथे नाकाबंदी लावण्यात आली व सदर बसबाबत माहिती देण्यात आली. तपास पथक काही अंतरावर या बसचा पाठलाग करित होते याचवेळी सदर बस मिळून आल्याने ती बस पो.स्टे गिट्टी खदान येथे थांबवून ठेउन बसची झडती घेतली असता त्यातील आरोपी सिद्धार्थ ढोणे व कु खुशी ही मिळून आले. लगेच जलालखेडा पोलिसांचे पथकाने तेथे पोहोचून . पो.स्टे. गिट्टी खदान येथे ताब्यात घेण्यात आले व लगेच जलालखेडा पोलिसांनी पोहोचून आरोपी सिद्धार्थ ढोणे व मुलीला आपले ताब्यात घेतले. तक्रार

प्राप्त व्हायला उशिर होउन सूद्धा पोलिसांनी तात्काळ कारवाई केल्याने एका निष्पाप मुलीला कोणत्याही अनैतीक कृत्यापासून वाचवून तिला तिचे आईचे ताब्यात देण्यात आले.

आरोपी सिद्धार्थ ढोणे वय २२ वर्ष रा जोगीनगर नागपूर येथील रहिवासी असून तो सतत बेवारस फिरत राहतो त्याचा राहण्याचा कोणताही मुळ ठिकाणा नसून तो ६/८ महिन्यांमधून नातेवाईकांकडे येतो व ३ /४ दिवस राहून निघून जातो. त्यामुळे त्याला शोधतांना अडचणी निर्माण झाल्या. कोणत्याही नातलगांकडे त्याचा फोटो, मो.क्रमांक , कायमचा पत्ता मिळून येत नव्हता.

कु. खुशी हिचे अपहरण झाल्यापासून अवघ्या ४/५ तासात पोलिसांनी आरोपी चा छडा लावला व मुलीची सूखरुप सुटका केली.

सदरची कारवाई मा.पोलिस अधिक्षक श्री अनंत रोकडे, अ.पोलिस अधिक्षक श्री नरसिंग शेरखाने, श्री ईश्वर कातकडे यांचे मार्गदर्शनात सपोनि दिनेश लबडे, पोउपनि विजय कोरडे, ए एसआय गणपत जाधव, पो.हवा संजय इंगोले, दिलीप इंगळे, नापोशि कृणाल अरगूडे, श्रीनिवास वाघ, मंगेश नासरे, पोलिस मित्र रुपेश चौधरी, प्रविण शेंडे यांनी पार पाडली.

तपासी अधिकारी :- सहा. पोलीस निरीक्षक श्री. दिनेश लबडे,





